drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
16 Dec, 2024

## Total Mention 6

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 2 | N/A | N/A | 2 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| 4 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1. | Mumbai Tarun Bharat | When will the development of Kurla get speed from the government | Mumbai | 6 |
| 2. | Pudhari | Rally in Dharavi for drug free | Mumbai | 5 |

Mumbai Tarun Bharat • 16 Dec • Dharavi

# When will the development of Kurla get speed from the government

| 6 • PG | 108 • Sqcm | 13463 • AVE | 17.73K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai



# कुर्ल्याच्या विकासाला शासनाकडून गती कधी मिळणार?

**मुंबई दि. १५ : सागर देवरे**

कुर्ला शहराला विकासाची अत्यंत गरज असताना शासनाकडून विकास प्रकल्पांची केवळ घोषणा किंवा घोषित केलेल्या प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. प्रत्यक्षात कुर्ला शहराची परिस्थिती आणि विकास 'जैसे थे'च आहे. त्यामुळे कुर्ल्याच्या विकासाला गती कधी मिळणार, असा प्रश्न 'नागरिक कृती समिती कुर्ला'च्यावतीने करण्यात येत आहे.

## 'नागरिक कृती समिती कुर्ला' अन्याय होऊ देणार नाही

*सन २००३ साली कुर्ला स्थानकालगत असलेल्या 'मेट्रो' प्रकल्पाला वळण देऊन तो मागासवर्गीय समाजाच्या वस्तीकडे वळवला. त्यामुळे कुर्ला येथे नवाब मलिक यांनी सरकारमधील काँग्रेस राष्ट्रवादीचा गैरफायदा घेऊन बौद्ध कॉलनी आणि नेताजीनगर येथील मागासवर्गीय समाजाला निर्वासित केले. या सर्व गोष्टी विचारात घेऊन 'नागरिक कृती समिती' समाजातील कोणत्याही घटकांवर अन्याय होऊ देणार नाही, याबाबत दक्ष आहे.*

**– उमेश गायकवाड,** *निमंत्रक, नागरिक कृती समिती कुर्ला*

कुर्ला येथे नुकतेच झालेला 'बेस्ट' बसचा भीषण अपघात याच प्रलंबित असलेल्या विकासामुळे झाला आहे, असे दिसून येते. मध्य आणि हार्बर मार्गासाठी जंक्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुर्ला शहराला 'वांद्रे-कुर्ला संकुल' जोडले आहे. जिथे अनेक खासगी व्यावसायिक संस्थांसहित शासकीय संस्थांची कार्यालये वसलेली आहेत. या सर्व संस्थांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या ही लाखांच्या घरात आहे. एकट्या कुर्ला शहरातून पाच लाखांहून अधिक प्रवासी रोजगार आणि कलिना येथे मुंबई विद्यापीठात शैक्षणिक कारणास्तव प्रवास करतात. त्याचप्रमाणे 'वांद्रे-कुर्ला संकुल', कलिना आणि अंधेरीसारख्या व्यावसायिक क्षेत्रांत काम करणारा प्रवासी वर्ग मोठा आहे. कुर्ला पश्चिम स्थानकालगत असलेल्या 'बेस्ट' बस डेपो येथून सुमारे ७५ हजार प्रवासी आणि कुर्ला पूर्व येथून ६० हजार प्रवासी प्रवास करतात, असे एका सर्वेक्षणातून कळले, अशी माहिती 'बृहन्मुंबई मनपा एल विभाग' अधिकारी यांनी दिली. याशिवाय, ऑटो-रिक्षा, टॅक्सी, खासगी बस आणि इतर वाहने गर्दीच्या वेळेत येथे चालतात.

त्यामुळे ठाणे स्थानकाप्रमाणे कुर्ला स्थानकाजवळ सॅटीस (स्टेशन एरिया ट्रॅफिक इम्प्रूव्हमेंट स्कीम)प्रमाणे विकसित केले पाहिजे, असा विचार मुंबई महापालिका आणि राज्य सरकारच्यावतीने करण्यात आला आहे. याला प्रशासनाकडून तत्वतः मान्यता मिळाली असताना नागरी संस्थेने सविस्तर प्रकल्प (डीपीआर) आराखडा आखण्यासाठी आणि तो सुनियोजित तयार करण्यासाठी सल्लागार समिती नेमली गेली. मात्र, या प्रकल्पाआड येणारा 'झारीतील शुक्राचार्य' नेमका कोण, असा प्रश्न आहे. कुर्ला शहराचा विकास व्हावा यासाठी 'नागरिक कृती समिती कुर्ला' या संस्थेने नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या सहभागाने विकास आराखडा सरकारकडे दाखल केला आहे. मात्र, त्यावर शासनाकडून येणारा प्रतिसाद हा समाधानकारक नाही. धारावीच्या विकासासाठी ज्याप्रमाणे निविदा काढण्यात आली. त्याचप्रमाणे, कुर्ला शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निविदा काढण्यात यावी, यासाठी नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद आहे. तसेच, आवश्यक आराखडा आणि लोकसहभाग हा 'नागरिक कृती समिती कुर्ला' यांच्याकडे उपलब्ध आहे.

Development issues in Kurla city, highlighting the need for better infrastructure and public transport. It mentions that Dharavi tender for overall development has received a positive response from citizens.

Pudhari • 16 Dec • Dharavi

# Rally in Dharavi for drug free

| 5 • PG | 101 • Sqcm | 90743 • AVE | 347.1K • Cir | Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

संक्षिप्त



## अमली पदार्थ मुक्तीची शपथ देत व्यसनमुक्तीसाठी धारावीत रॅली

**मुंबई :** धारावी परिसरात दिवसेंदिवस वाढत जाणारी व्यसनाधीनता व समाज प्रबोधन करण्याच्या उद्देशाने नशामुक्त भारत अभियान अंतर्गत नशाबंदी मंडळ, धारावी पोलीस ठाणे नशामुक्त धारावी अभियान, स्थानिक धारावीकर यांच्यासह विविध संस्था संघटना यांच्यातर्फे रविवारी सायन रेल्वेस्थानक ते ९० फुटी मार्ग या मार्गावर व्यसनमुक्ती रॅली काढण्यात आली. धारावी विभागात ड्रग्स, व्यसनांचे वाढते प्रमाण आणि व्यसनी व्यक्ती व व्यसनी पदार्थ विक्रेते यांना परावृत्त करणे यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे नेतृत्व धारावी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीकांत धरणे, नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास, धारावी नशामुक्त संघटनाचे पदाधिकारी कार्यकर्ते, मंडळाचे कार्यकारिणी सदस्य व राष्ट्रीय प्रशिक्षक बॉस्को डिसोजा, विनोद साडविलकर व नागरिकांच्या हस्ते हिरवा ध्वज दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. व्यसनांचे विदारक रूप प्रकटविणारे लहान पोस्टर्स, बॅनर्स, स्लोगन आदीद्वारे संदेश देत धारावी परिसर दमदुमुन निघाला. यात स्थानिक नागरिकांचा उस्फुर्त सहभाग होता.

the article describes an anti-addiction rally organized by narshabandi mandal, dharavi police station nashamukt dharavi abhiyan, local residents, and other organizations in dharavi to raise awareness about drug addiction. senior officials led the rally from sion railway station, emphasizing the need to discourage the use of drugs and support addicts.

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Sanatanprabhat | धारावी (मुंबई) येथे 'नशामुक्ती भारत अभियान" अंतर्गत 'व्यसनमुक्त फेरी" काढली ! | 973.4K |
| 2. | तरुण भारत (young india) | भारतीय संविधान चिरायु होवो | 191.6K |
| 3. | Kashmir Reader | BJP ridiculing Savarkar when it talks of protecting Constitution: Rahul Gandhi | 152.7K |
| 4. | Indiatomorrow.net | Rahul rips apart the government, and says, "You are disabling India as Dronachar ... | N/A |